सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २५७

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०६/२०२२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२१२ ते ठराव क्र.२५५ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्त कायम करतेवेळी झालेल्या चर्चेनुसार ठराव क्र.२१२ मध्ये मानधन कर्मचारी यांचे नावाचा केलेला समावेश ही सभा रद्द करीत असून, सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे. तसेच, महासभा दि.१८/०४/२०२२ अन्वये पारित करणेत आलेला ठराव क्र.१९६ ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- श्री. शेउजी सोहिते. ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. संतोष पाटील. महापौर,

महानगरपालिका

प्रशा. अधि. (आस्था)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २५८

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

जम्मु काश्मिर मधील पहलगाममध्ये एक मोठी दुर्घटनमध्ये ३९ जवानांनी चंदनवाडीवरुन पहलगामला जाणाऱ्या बसला भीषण अपघात झाला. त्यापैकी आय.टी.बी.पी.४ जवानाचे अपघाती निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.युवराज सतिश बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

D/. Suryavanshi

अनुमोदक :- श्री.धीरज चंद्रकांत सुर्यवंशी

महापौर,

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २५९

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष श्री.विशाल पाटील व माजी केंद्रीय कोळसा राज्यमंत्री श्री.प्रतिक पाटील यांच्या भगिणी कै.डॉ.मधु प्रकाशबापू पाटील यांचे दि.१२/०८/२०२२ रोजी वयाच्या ४४ व्या वर्षी हृदयविकाराने आकस्मिक दु:खद निधन झाले. त्या सांगली येथील नांद्रे प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी म्हणून कार्यरत असताना सामान्य गोरगरिब जनतेसाठी मोठे काम केले होते. त्या सद्या पुणे आरोग्य उपसंचालक येथे कार्यरत होत्या. त्यांनी कोरोना कालावधीतही जनतेसाठी झटून काम केले होते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.उमेश विलास पाटील

अनुमोदक :- श्री.मनोज रघुनाथ सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

D/Suryavarshi

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २६०

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली जिल्ह्याच्या विटा-खानापूर मतदार संघाचे आमदार श्री.अनिल बाबर यांच्या पत्नी शोभा बाबर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.स्वाती नितीन शिंदे

अनुमोदक :- सौ.सुनंदा चंद्रकांत राऊत

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

महा-नगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २६१

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या विद्यमान सदस्य श्री.राजेंद्र लक्ष्मण कुंभार यांच्या मातोश्री कै.संगव्वा लक्ष्मण कुंभार यांचे वयाचे ९० व्या वर्षी दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.गजानन रामू मगदूम

अनुमोदक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सांगली

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २६१

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या विद्यमान सदस्य श्री.राजेंद्र लक्ष्मण कुंभार यांच्या मातोश्री कै.संगव्वा लक्ष्मण कुंभार यांचे वयाचे ९० व्या वर्षी दि.१५ ऑगस्ट २०२२ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.गजानन रामू मगदूम

अनुमोदक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २६२

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी अहोरात्र झटणारे शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष मा.कै.विनायकजी मेटे यांचे नुकतेच अपघाती निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर दु:खाचा आघात झाला. त्यांच्या आमदारकीच्या कालखंडामध्ये त्यांनी विधानसभेमध्ये अनेक प्रश्न उपस्थितीत करुन सर्व सामान्यांना न्या मिळवून दिला. त्यांनी सर्व सामान्य नागरिकांचे प्रधान्याने प्रश्न सोडवून दिला. त्यांच्या कुटूंबियांच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.युवराज सतिश बावडेकर

अनुमोदक :- श्री.धीरज चंद्रकांत सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २६३

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या माजी नगरसेवक श्री.सुनिल पाटील यांचे बंधू व कर्नाळ ता.मिरज येथील माजी सरपंच कै.सुरेश रघुनाथराव पाटील यांचे वयाचे ६० व्या वर्षी आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.संतोष शिवदास पाटील

अनुमोदक :- सौ.रोहिणी सत्यजीत पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

Dfsuryavanshi.

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- २६४

दिनांक :- १८/०८/२०२२

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

मराठा क्रांती मोर्चाचे जेष्ठ शिलेदार व पत्रकार,साहित्तीक श्री.नामदेव भोसले यांचे निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.स्वाती नितीन शिंदे

अनुमोदक :- सौ.सुनंदा चंद्रकात राऊत

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Sursavarshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २६५

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

दैनिक सकाळचे छायाचित्रकार,जुने काळातील सुप्रसिद्ध छायाचित्रकार सगळ्याचे काका म्हणजे श्री.चंद्रशेखर शिवराम देवळेकर यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.स्वाती नितीन शिंदे

अनुमोदक :- श्री.रणजित सावर्डेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- २६६

विषय क्रमांक :- ०२

दिनांक :- १८/०८/२०२२

दु:खवट्याचा ठराव

तरुण भारत व्यायाम मंडळाचे जेष्ठ खेळाडू व सभासद रघुनाथ दामोदर शिंदे वय ७० यांचे सांगली ते हरिपुर कृष्णा नदी मध्ये पोहत असताना हृदयविकाराचे तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांच्या झालेल्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.स्वाती नितीन शिंदे

अनुमोदक :- श्री.रणजीतसिंह सावर्डेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Sawardekar

महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २६७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

देशाच्या १५ व्या राष्ट्रपती पदी मा.ना.द्रौपदी मुर्मू व उपराष्ट्रपती पदी मा.ना.जगदीप धनखड यांची निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

अनुमोदक :- श्री.शेखर मधुकर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryawanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २६८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी मा.ना.श्री.एकनाथ शिंदे व व उपमुख्यमंत्री पदी मा.ना.देवेंद्रजी फडणवीस यांची निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

अनुमोदक :- श्री.शेखर मधुकर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavarshi

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- २६९

विषय क्रमांक :- ०२

दिनांक :- १८/०८/२०२२

अभिनंदनाचा ठराव

आमदार मा.श्री.चंद्रकांत दादा पाटील यांची महाराष्ट्र राज्याच्या केबिनेट मंत्री पदी निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.युवराज सतिश बावडेकर

अनुमोदक :- श्री.धीरज चंद्रकांत सूर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २७०

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

मिरज विधान सभा मतदार संघाचे आमदार मा.श्री.सुरेशभाऊ खाडे यांची राज्याच्या केबिनेट मंत्री पदी निवड झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.युवराज सतिश बावडेकर

अनुमोदक :- श्री.धीरज चंद्रकांत सूर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २७१

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशाध्यक्ष पदी मा.आ.चंद्रशेखर बावनकुळेसो यांची नियुक्ती झाल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.बिनायक रमेश सिंहासने

अनुमोदक :- श्री.शेखर मधुकर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २७२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली पोलीस दलामध्ये मिरज शहराचे पोलीस उपअधिक्षक श्री.अशोक वीरकर यांना सर्वोत्कृष्ठ तपासाच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल केंद्रीय गृहमंत्री २०२२ पदक या पदकाने सन्मानित केलेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.संगिता बिठ्ठलराव खोत

अनुमोदक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८३

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

१५ ऑगस्ट २०२२ या भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी दिनी सांगलीच्या डॉ.अभय पंडितराव मोरे यांनी युरोप खंडातील रशियास्थित माऊंट एलब्रुस (उंची १८५०५ फुट) हे सर्वोच्च शिखरावर पदाक्रांत करित त्या ठिकाणी भारतीय तिरंगा फडकवून राष्ट्रगीत गायले. गाराबास या बेस कॅम्प वरुन त्यांनी शिखरावर चढाईस सुरुवात केली आणि शिखरावर पोहोचण्यासाठी तब्बल आठ तास लागले.डॉ.मोरे यांचे एप्रिल-मे २०२२ मध्ये माऊंट एव्हरेस्टच्या चढाईचे लक्ष असून, त्याच्या तयारीचा भाग म्हणून १४ जून २०२२ रोजी आफ्रिका खंडातील सर्वोच्च शिखर माऊंट किलीमंजारो आणि १५ ऑगस्ट २०२२ रोजी रशियास्थित माऊंट एलब्रुस अशी दोन शिखरे सर केली वयाच्या ५८ व्या वर्षी अशी कामगिरी करणारे ते महाराष्ट्रातील पहिले बँक अधिकारी ठरले आहेत. डॉ.अभय मोरे यांनी केलेल्या कामगिरीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.संतोष शिवदास पाटील

अनुमोदक :- सौ.रोहिणी सत्यजीत पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २७४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच इंग्लड बर्मिंगहॅम येथे पार पडलेल्या २२ व्या राष्ट्रकुल क्रिडा स्पर्धेत सांगलीचा सुपूत्र संकेत महादेव सरगर यांनी ५५ किलो वजनी गटात वेटलिफ्टींग या खेळात भारताला रौप्य पदक मिळवून दिले. कै.किरण नाना सिंहासने यांचे मार्गदर्शना खाली मा.मयुर किरण (नाना) सिंहासने यांचे नेतृत्वाखालनी यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण भारत देशात सांगली जिल्ह्याचे नाव लौकीक झाले आहे. त्यांनी असेच यश भविष्यातही संपादन करुन भारत देशाचे नाव लौकीक करावे संकेत महादेव सरगर यांनी मिळविलेल्या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

अनुमोदक :- श्री.शेखर मधुकर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २७५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

मि.युनिव्हर्स जागतीक शरीर सौष्ठव स्पर्धा बालेवाडी पुणे येथे संपन्न झालेल्या स्पर्धेमध्ये रामकृष्ण चितळे (आंतरराष्ट्रीय पंच) यांनी पंच म्हणून उत्तम कामगिरी केली. त्यांच्या या कामगिरीचे शरीर सौष्ठव परिवारात कौतुक होत आहे. श्री.चितळे यांचे कामगिरीमुळे सांगलीचे नाव देशभर कौतुकाने घेतले जात आहे. त्यामुळे श्री.चितळे यांनी केलेल्या कामगिरीबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D f. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २७६

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे अति.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२२/०७/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील वखारभाग येथील महानगरपालिकेच्या ट्रक टर्मिनलला स्वातंत्रसैनिक बापूसाहेब पाटील ट्रक टर्मिनल असे नामकरण करणेस अंतीम मान्यता देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. धीरज सूर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संजय मेंढे

D.P. Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- २७८

विषय क्रमांक :- ०५

दिनांक :- १८/०८/२०२२

सोबतचे अति.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२२/०७/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील स.नं.४४/१अ,४४/२अ,४४/३अ व क मधील परिसरास पाटील मळा असे नामकरण करणेस अंतीम मान्यता देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.संजय मेंटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.धीरज सूर्यवंशी.

महापौर,

सहाय्यक आयुक्त

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- २७८ दिनांक :- १८/०८/२०२२

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.३०/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेमध्ये अंदाजे १५०० मानधन,बदली व कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य विमा योजना (ESIC) लागू करणेस दिनांक दि.२२ डिसेंबर २०१६ च्या अधिसूचनेनुसार कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या एकूण वेतनाच्या ४.३४% हिस्सा महानगरपालिकेने व १.३४% हिस्सा कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करुन सदरची रक्कम राज्य विमा योजना महामंडळाकडे दरमहा भरणेस व महानगरपालिका हिस्सा ४.३४% प्रमाणे अंदाजीत एक हजार कर्मचाऱ्या प्रमाणे र.रु.५,९०,०००/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफसशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या सन १९९० चा टंकलेखन संदर्भातील शासन निर्णयानुसार लिपीक पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास टंकलेखन परिक्षा तसेच वरिष्ठ लिपीक पदोन्नतीसाठी LSGD परिक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. नगरपरिषदा / नगरपालिकेचे कामकाज सुरळीत राहणेकरीता तत्कालीन नगरपालिका प्रशासनाने तसेच विद्यमान मनपा प्रशासनाने कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने काही कर्मचाऱ्यांना तसेच वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने लिपीक पदोन्नती दिली होती. त्यावेळी नियुक्ती आदेश किंवा पदोन्नती आदेशामध्ये नगरपालिका सेवा प्रवेश नियमावली नुसार देण्यात आलेले होते.

तथापि, यापैकी काही कर्मचाऱ्यांनी टंकलेखन, LSGD व तत्सम प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांचे सेवा निवृत्ती वेतन लाभ आदा करताना प्रशासकीय अडचणी निर्माण होत आहेत. मात्र महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखन / मराठी टंकलेखन परिक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१ मध्ये नमुद (१०) नुसार या नियमावलीतील काहीही अंतर्भूत असले तरी शासनाला विशेष परिस्थितीमध्ये यापैकी कोणत्याही नियमाच्या तरतुदी त्याला न्याय व संयुक्तिक वाटेल अशा रीतीने शिथिल करता येतील. मात्र अशा कोणत्याही शिथिलीकरणाची कारणे नमुद करावी लागतील अशा रितीने शिथिल करता येईल. मात्र अशा कोणत्याही शिथिलीकरणाची कारणे नमुद करावी लागतील असे नमुद केले आहे.

महानगरपालिका अधिनियमाद्वारे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून, नियुक्ती प्राधिकरण ही मनपा स्वत: आहे. यास्तव तत्कालीन महानगरपालिका प्रशासनाने कामकाजाच्या सोयीसाठी नियुक्ती / पदोन्नती दिलेल्या व सद्या सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक सेवेचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन या कर्मचाऱ्यांकडून भविष्यात लेखापरिक्षण किंवा इतर कोणत्याही बाबीद्वारे निवृत्ती वेतनातून वसुली आदेश झाल्यास त्यास त्यांची व वारसांची संमत्ती असेल असे बंधपत्र घेण्याच्या अटीवर उपरोक्त नमुद शासन निर्णय / नियमावलीत शिथिलता देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रनिमं-१२८६/प्र.८६(१)/८८-तेरा-अ दिनांक ०९ फेब्रुवारी १९८८अन्वये राज्य शासनाच्या त्याचप्रमाणे निमशासकीय संस्था/महामंडळे,प्राथमिक शिक्षण कायदा १९४७ च्या कलम २०८ अन्वये अस्तित्वात असलेली प्राथमिक शिक्षकांची पदे तसेच जिल्हापरिषद,पंचायत समिती नगरपरिषदा यांच्या दुय्यम सेवेतील वर्ग ३ ची पदे निवड मंडळाच्या कक्षेत आणण्यात आली असून, सदरची पदे निवड मंडळामार्फतच भरणे आवश्यक होती. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रनिमं-१२८६/प्र.८६(१)/८८-तेरा-अ दिनांक ०९ फेब्रुवारी १९८८अन्वये निवड मंडळ अस्तित्वात आलेल्या दिवशी रिक्त असणारी व भविष्यात रिक्त होणारी अशी सर्व पदे निवड मंडळाकडून भरणेत यावी. सदर पदावर थेट नियुक्त्या करता येणार नाहीत. त्यामुळे अशा नियुक्त्या करणेसाठी पूर्वी अस्तित्वात असलेली निवड मंडळे/सल्लागार समित्या सदर निवड मंडळ अस्तित्वात आलेपासून आपोआप विसर्जीत झालेचे मानण्यात येईल. त्यामुळे निवडमंडळाच्या कक्षेतील पदे भरणेसाठी नियुक्ती प्राधिकारी यांनी आपले मागणीपत्र निवडमंडळाकडे पाठविण्यात यावे व निवडमंडळाकडून प्राप्त यादीतील उमेदवारांना नियुक्ती देणे बंधनकाराक केले होते तथापि तत्कालीन नगरपरिषदेने कामकाजाची निकड पाहता स्थानिकरित्या विहित मार्गाने नियुक्त्या केल्या आहेत. सदर कर्मचाऱ्यांच्या विहित मार्गाने सेवा नियुक्ती झाली असलेने, निवड मंडळामडून भरती न झालेमुळे कर्मचाऱ्यांनी केलेल्या सेवा पाहता अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या ज्या त्रुटीमुळे सेवानिवृत्ती विषयक लाभ अदा करताना अडचणी निर्माण होत आहेत. सबब, अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या वरील बाबी शिथील करुन संबंधीत कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, तत्कालीन सांगली नगरपालिका अस्तित्वात असताना एकूण ३५ रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना महानगरपालिका झालेनंतर कायम सेवेत घेणेत आले आहे ते कर्मचारी मे.कोर्टात गेलेने त्यांना सेवेत घेतले आहेत. ज्यावेळी महापालिकेने त्यांना महापालिकेच्या कायम सेवेत नेमणूकीचे वेळी महासभा ठराव क्र.७० दि.२०/०६/२००० ने मान्यता झाली व त्यामधील नमुद अट क्र.३ मध्ये रोजंदारी काळातील कायम सेवक म्हणून कोणतेही आर्थिक लाभ न देणे बाबत नमुद होते.

तद्नंतर महासभा ठराव क्र.१५५ दि.२०/१०/२००० ने ही अट रद्द करण्यात आली व त्याप्रमाणे सदरहू सेवकांना रोजंदारी काळातील आर्थिक लाभ देणेत आलेले आहेत. या ३५ कर्मचाऱ्यांपैकी जे कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत व झाले आहेत त्यांना पेन्शन मंजूर करताना महापालिका लेखापरिक्षण विभागाकडून आक्षेप न घेता, आर्थिक लाभ देणेत यावेत व सद्या सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक सेवेचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन या कर्मचाऱ्यांकडून भविष्यात लेखापरिक्षण किंवा इतर कोणत्याही बाबीद्वारे निवृत्ती वेतनातून वसुली आदेश झाल्यास त्यास त्यांची व वारसांची संमत्ती असेल असे बंधपत्र घेण्याच्या अटीवर आर्थिक लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. अतहर नायकवडी. D. P. Suryavanshi महापौर,

प्रशासन अधिकारी (आस्था)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २७९

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (शिक्षण विभाग) यांचे दि.२७/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या शाळामध्ये विद्यार्थ्यांना कलाक्रिडा व बौद्धीक शिक्षण उपलब्ध करुन देणेसाठी मानधन तत्वावर एकूण ६० विशेष शिक्षक (प्रशिक्षक) यांची माहे जून २०२२ ते माहे मे २०२३ या कालावधी मध्ये दरमहा मानधन र.रु.१०,०००/- मात्र प्रमाणे नियुक्ती करणेस व त्याकामी एकूण र.रु.७२,००,०००/- मात्र खर्चास विषयपत्रातील एकूण ५ बाबींनुसार जाहिरात प्रसिद्ध करुन अर्ज मागविणेस धोरणात्मक निर्णयार्थ आलेल्या विषयावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सद्यस्थितीत महापालिकेच्या शाळेमध्ये बेसीक व नियमिती शिक्षण देणारे शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने प्राधान्याने त्या शिक्षकांची भरती प्राधान्याने करणे या सभागृहास आवश्यक वाटते. त्याच बरोबर महापालिका शाळांच्या इमारतींची ढागडुजी करणे, शाळेमध्ये बेसीक आवश्यक असणाऱ्या गोष्टींची व्यवस्था करणे तसेच, आवश्यकतेनुसार जादा वर्ग खोल्या व शौचालयांचे बांधकाम करणे आवश्यक असून, शाळांची सुधारणा करणे व शाळा सक्षम करणेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

त्यासाठी उपरोक्त सर्व सुधारणा व त्या अनुषंगिक कामगिरी करणेसाठी सभागृहनेते, विरोधी पक्षनेते, सर्व पक्षाचे गटनेते यांची संयुक्त समिती करुन, सदर समितीने सुधारणाबाबतचा अहवाल सादर करावा असे ही सभा आदेशित करीत असून, सदर समितीचे सदस्य सचिव म्हणून प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग हे काम पाहतील. सदर समितीचा अहवाल प्रशासनामार्फत प्राप्त होईतोपर्यत सदरचा विषय ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- श्री.रोहिणी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील

महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८०

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे अति.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०७/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन १९९८ मध्ये स्थापन झालेली असून, सद्या महापालिकेमध्ये कायम २४०० पदे मंजूर आहेत व १५०० मानधन,बदली व कंत्राटी असे एकूण ४००० कर्मचारी अधिकारी कार्यरत आहेत या कर्मचारी अधिकारी व त्यांचे कुटूंबिय यांचेसाठी मनपा क्षेत्रामध्ये एकही बहुउद्देशीय हॉल अथवा स्वतंत्र स्पोर्टस कॉम्प्लेक्स अस्तित्वात नाही. महापालिका क्षेत्रामध्ये मनपा कर्मचारी अधिकारी यांचेसाठी अशी कोणतीही सुविधा सद्या उपलब्ध नाही. तसेच सदर कर्मचारी यांची संख्या व कामाचे स्वरुप विचारात घेता त्यांची कार्यक्षमता वाढविणेसाठी व राहणीमान उंचविण्यासाठी व त्यांचे कुटूंबिय / अपत्यांचे शुभ कार्यासाठी व खेळ / व्यायाम /योगा या आरोग्याच्या दृष्टीने महत्वपुर्ण आवश्यकत्या सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

महापालिकेच्या वतीने क्रिडा संकुल-बहुउद्देशीय हॉल उभारणी केल्यास विविध प्रकारचे खेळ / स्पर्धा / सराव करण्यासाठी स्वतंत्र हॉल यामध्ये कबड्डी, बॅडमिंटन,खोखो,ज्युदो,रिंगटेनिस, बास्केटबॉल इ. अनेक खेळांचा सराव करता येईल. तसेच यामध्ये खेळाडूंसाठी सेवा सुविधा (Changing rooms, Toilet-bathrooms, dormitories, rest rooms) अशा तऱ्हेने सुसज्ज स्पोटर्स कॉम्प्लेक्स उभा करणे आवश्यक आहे. याचा उपयोग मनपाच्या कर्मचारी यांना व त्यांचे अपत्यांना होईल आणि सदरचा हॉल इतर संस्था/शाळा/क्रिडा मंडळे यांना स्पर्धा घेण्यासाठी (तासिका / दैनिक) भाडेतत्वावर देता येईल यामधून देखभाल दुरुस्ती इ.साठी उत्पन्न मिळू शकेल.

तसेच, सभासद मनपा कर्मचारी-अधिकारी यांचेसाठी व त्यांच्या कुटूंबियांचे शुभकार्यासाठी एक सर्व सोयीने युक्त कार्यक्रम हॉल (banquet hall) असणे देखील गरजेचे आहे कारण मनपाचे बहुतांश कर्मचारी हे वर्ग ४ चे असल्याने त्यांचेसाठी कमी रक्कमेमध्ये शहरात सद्या हॉल / कार्यालये उपलब्ध नाहीत. सदर हॉल हा ४०० ते ५०० लोकांची उपस्थिती अपेक्षित ठेवून मनपा कर्मचारी यांचेसाठी नाममात्र शुल्क आकारुन व त्यामध्ये विविध सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्यास कर्मचारी यांची सोय होईल व त्यामधून देखभाल दुरुस्तीसाठी उत्पन्न देखील मिळू शकेल. त्याच बरोबर महापालिकेमध्ये बाहेरील शहरामधून येणारे शासकीय अधिकारी/पदाधिकारी यांचेसाठी योग्य शुल्क आकारणी करुन राहणेची व्यवस्था या ठिकाणी करता येईल असे या सभेचे मत आहे.

मनपाचे SMKC Sports Club स्थापन करणे व विकसीत करणे यासाठी किमान ४००० चौ.मी. इतक्या जागेची आवश्यकता आहे. मनपा क्षेत्रामध्ये सांगली हद्दीत स.नं.३३४ मध्ये अंदाजे ६०८६४ मीटर इतक्या क्षेत्रफळाची जागा महापालिकेच्या मालकीची जागा आहे. त्यामध्ये ४७००० चौ.मी. क्षेत्रावर स्पोर्टस कॉम्प्लेक्स चे आरक्षण असून, सदर जागेपैकी ४००० चौ.मी.इतक्या जागेवर SMKC Sports Club विकसीत करणे शक्य आहे. सदरची जागा शहराच्या मध्यवर्ती व सर्व घटकांना सोईची असून, या ठिकाणी इन डोअर मल्टीपर्पल हॉल,स्पोर्टस हॉल,जीम,योगा हॉल,गेस्ट रुम, बैठक हॉल,रेस्टारंट इ.सोईनियुक्त SMKC Sports Club ची सुसज्ज इमारत बांधकाम करता येईल.

सदर SMKC Sports Club इमारत उभारणेसाठी महापालिकेच्या सिटी कॉर्पोरेशन सॅलरी अॅर्नस को.ऑप.क्रे.सोसा.लि. यांनी रु.५० लक्ष अनुदान देणेची व महापालिकेसह संयुक्त विद्यमाने सदर Sports Club चालविणेची मागणी केलेली आहे. प्राथमिक अंदाजानुसार सदर ठिकाणी स्पोर्टस कॉम्प्लेक्स बांधणेकामी रु.३०० लक्ष मात्र खर्च अपेक्षित असून, महापालिका कर्मचारी सॅलरी सोसायटी कडून रु.५०लक्ष मनपा निधी १०० लक्ष कर्मचारी सभासद फी ५० लक्ष व इतर माध्यमाद्वारे अंदाजे १०० लक्ष असे एकूण ३०० लक्ष निधीची उपलब्धता होईल.

सदरचा प्रकल्प विकसीत झाल्यानंतर तो व्यवस्थितपणे सुरु राहणेसाठी व त्याची देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगिक खर्चासाठी मनपा कर्मचारी/अधिकारी यांचेकडून मासिक वार्षिक मेंबरशिप फी घेणेस ही सभा मान्यता देत आहे. त्याच बरोबर सदर बहुउद्देशिय हॉल इतर घटकांना तासिक / दैनिक भाड्याने दिल्यास त्यापासूनही उत्पन्न मिळू शकते त्यामधून देखभाल दुरुस्ती कर्मचारी वेतन भत्ते, मानधन, स्वच्छता, विज,पाणी व इतर शासकीय कर भागविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

महापालिका व सांगली मिरज आणि कुपवाड सिटी कॉर्पोरेशन सॅलरी अॅर्नर्स को.ऑप.क्रे.सोसा.लि. यांचे संयुक्त विद्यमाने अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सि.स.नं.३३४ मधील ४००० चौ.मी.जागेमध्ये SMKC Sports Club स्थापन करणेस व विकसीत करणेस ही सभा मान्यता देत असून, सदर SMKC Sports Club बाबतची कायदेशीर पुर्तता करणेस, करारपत्र करणेस,नियम शर्ती-अटी, बायलॉज् सेवा फी शुल्क आणि सांगली मिरज आणि कुपवाड सिटी कॉर्पोरेशन सॅलरी अॅर्नर्स को.ऑप.क्रे.सोसा.लि. यांचेबरोबर करारपत्र करणेस व सनियंत्रण समितीची संरचना ठरविण्यास ही सभा मा.आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- श्री. विनायक सिंहासने ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सांगली
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- S.S. Salve सौ. सविता मोहिते

D.P. Suryavanshi.
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८१

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे अति.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका विभागीय कार्यालय मिरज कडील रेल्वे स्टेशन जवळील सद्या बंद आवस्थेत असलेला जूना जकात नाका, गांधी चौक पोलीस ठाणे, मिरज यांना भविष्यात रस्त्यासाठी महानगरपालिकेला आवश्यकता लागल्यास रिकामी करुन देणेच्या अटीवर भाडे तत्वाने वार्षिक भाडे र.रु.८५,८४८/- मात्र भाडे आकारणी करुन, जागा भाडेपट्टयाने देणेकामी निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा सदरचा विषय प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- श्री.शेखजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संजय मेंढे D.P. Suryavanshi महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८२

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१५/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

गावभाग ॲलो.दवाखाना क्र.६ सांगली येथे महानगरपालिका व गुलाबराव पाटील होमिओपॅथीक मेडीकल कॉलेज,मिरज यांचे संयुक्त विद्यमाने महानगरपालिकेच्या शर्ती-अटीस अधिन राहून मोफत होमिओपॅथीक दवाखाना सुरु करणेस मान्यता देणेकामी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदरकामी आयुक्तसो,उपायुक्त,सभागृहनेते, विरोधी पक्षनेते,सर्व पक्षाचे गटनेते, उपमहापौर तसेच, स्थानिक नगरसेवक यांनी सदर ठिकाणी पहाणी करुन, होमिओपॅथीक दवाखाना सुरु करणेसाठी जागेची उपलब्धता तपासून परवानगी देणेबाबत निर्णय पुढीस सभेस सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.शेडजी मोहिते.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने.

D P. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- २८३

दिनांक :- १८/०८/२०२२

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०५/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मनपा मालकीच्या विविध शॉपिंग सेंटर तसेच मनपा क्षेत्रातील खोक्यांचे पुनर्वसन केलेल्या मुव्हेबल गाळ्यांचे भाडेकरु सदरी खास सवलत देवून, महिला/मुलींचे नाव लावणेकामी महापालिकेने निश्चित केलेल्या हस्तांतरण फी मध्ये १०% सवलत देवून, महिला/मुलींचे नाव लावणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संजय मेंढे

D.P.Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- २८४

दिनांक :- १८/०८/२०२२

विषय क्रमांक :- १२

उपायुक्त (बांधकाम विभाग,सांगली) यांचे दि.१६/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

जिल्हा नियोजन समितीच्या दि.१४/०१/२०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तामध्ये मा.आमदार श्री.सुरेश खाडे यांनी मागणी केलेनुसार कुपवाड तालुका मिरज येथील हजरत पीर लाडले मशायक दर्गा "क" वर्ग तिर्थक्षेत्रामध्ये घेणेत यावा असे निर्देश मा.पालकमंत्री यांनी दिलेले आहेत.

महाराष्ट्र शासन,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांचेकडील संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णय क्र.तिर्थवि-२०११/प्र.क्र.६५१/योजना-७ दि.१६/११/२०१२ अन्वये कुपवाड तालुका मिरज येथील हजरत पीर लाडले मशायक दर्गा "क" वर्ग तिर्थक्षेत्रामध्ये घेणेकामीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांची उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून, महापालिकेच्या वतीने विकसीत करणेत आलेल्या वॉर्ड क्र.०८,कुपवाड येथील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकाचा समावेश "क" वर्ग तिर्थक्षेत्रामध्ये घेणेकामीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विष्णू माने. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. लोकिक शिळकतगार. D.P. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

मी. मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८५

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,सांगली) यांचे दि.१६/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सन २०२१-२२ करिता महानगरपालिका हद्दीत १०% पेक्षा जास्त अल्पसंख्यांक असणाऱ्या बहुल क्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रम राबविणेसाठी खालील नमुद १० कामांचा र.रु.५०,००,०००/- मात्रचा प्रस्ताव जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मागणीसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय र.रु.
१.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.७ मधील वास्तयल्यनगर येथे पाण्याची टाकी व पेव्हींग ब्लॉक बसविणे	५,००,०००/-
२.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.१० मधील अस्लम वंटमुरे घराजवळील पी.सी.सी.गटर बांधकाम करणे	५,००,०००/-
३.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.५ मधील पिरजादे प्लॉट येथील अंतर्गत रस्ते कॉक्रिटीकरण करणे	५,००,०००/-
४.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.१५ मधील गल्ली नं.२ मधील रस्त्यांच्या दोन्ही बाजूस पी.सी.सी.गटर करणे	५,००,०००/-
५.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.५ मधील वेताळनगर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे	५,००,०००/-
६.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.५ मधील चाँद कॉलनी येथील रस्ता डांबरीकरण करणे	५,००,०००/-
७.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.१८ मधील हनुमाननगर गल्ली क्र.१ हिदायत मस्जिद परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे	५,००,०००/-
८.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.१६ मधील फौजदार गल्ली येथील शिवांश मेडिकल ते मशिद पर्यत पी.सी.सी.गटर करणे	५,००,०००/-
९.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.१६ मधील सांगली फौजदार गल्ली येथे कॉक्रिटीकरण करणे	५,००,०००/-
१०.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका वॉर्ड क्र.१५ मधील गारपीर दर्ग्याच्या समोरील रस्त्यांच्या दोन्ही बाजूस पी.सी.सी.गटर करणे.	५,००,०००/-
	एकूण र.रु.	**५०,००,०००/-**

सूचक :- श्री.सोन्नी मोहिते. ठराव सर्वानुमते मंजुर

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.संजय मेढे.

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८६

विषय क्रमांक :- १४

उपायुक्त (बांधकाम विभाग,सांगली) यांचे दि.१६/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सन २०२१-२२ करिता महानगरपालिका हद्दीत १०% पेक्षा जास्त अल्पसंख्यांक असणाऱ्या बहुल क्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रम राबविणेसाठी खालील नमुद ०६ कामांचा र.रु.३५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मागणीसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय र.रु.
१.	सांगली मनपा वॉर्ड क्र.१५ येथील मुजावर प्लॉट साई गॅरेजच्या बाजूला पी.सी.सी.गटर व सिमेंट कॉक्रिटीकरण करणे	५,००,०००/-
२.	सांगली मनपा वॉर्ड क्र.१२ मधील पेठभाग मुस्लीम कब्रस्तान येथे सुशोभिकरण करणे	१०,००,०००/-
३.	सांगली मनपा वॉर्ड क्र.१८ मधील जहीर मस्जिद बाहेर परिसरातील मस्जिद क्षेत्रासमोर पेव्हींग ब्लॉक बसविणे	५,००,०००/-
४.	सांगली मनपा वॉर्ड क्र.१० (ब) मधील मुस्लीम कब्रस्ताथ येथे सुशोभिकरण करणे	५,००,०००/-
५.	सांगली मनपा वॉर्ड क्र.१६ मधील शिराळकर जमादार गल्ली मुबारक घर ते वाहीद बेग घरापर्यत रस्ता कॉक्रिटीकरण करणे	५,००,०००/-
६.	सांगली मनपा वॉर्ड क्र.५ मधील रहमतुल्ला दफनभूमी शास्त्री चौक मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे	५,००,०००/-
	एकूण र.रु.	**३५,००,०००/-**

सूचक :- श्री.शेडजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संजय मेंटे

D.P. Suryavanshi

महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८७

विषय क्रमांक :- १५

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.०८/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज मंजूर विकास योजना नकाशानुसार मिरज बालगंधर्व नाट्यमंदीर विजापूर वेस ते जिलेबी चौक पर्यंतचा रस्ता हा ९.०० मी (३० फुट) व जिलेबी चौक ते तुळशीदास मठ पर्यंतचा रस्ता हा १२.०० मी (४०फुट) इतका होता. दि.०३/०३/३०१६ रोजीच्या मंजूर विकास योजना कलम ३१ (१) अन्वये मिरज बालगंधर्व ते जिलेबी चौक पर्यंतचा रस्ता हा १२.०० मी.४० फुट व जिलेबी चौक ते तुळशीदास मठ पर्यंतचा रस्ता हा ९.०० मी.(३० फुट) इतका रुंदीने प्रस्तावित असल्याने, या रस्त्यावरील मिळकतधारकांना ९.०० मी. रस्ता रुंदीने बांधकाम परवानगी करणेस मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे तुळशीदास मठ ते जिलेबी चौक व जिलेबी चौक ते बालगंधर्व हा रस्ता संलग्न होणेचे दृष्टीने रस्ता रुंदी ९.००मी.इतकी ठेवणे उचीत होणार असलेने, मिरज येथील मिरज बालगंधर्व नाट्यमंदीर विजापूर वेस ते जिलेबी चौक हा रस्ता ४० फुट ऐवजी ३० फुट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.शेडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील.

D.P.Suryavanshi
महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८८

विषय क्रमांक :- १६

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.०७/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज येथील खंदक जागेमध्ये भाजी मंडई करिता पोच रस्ता व महानगरपालिकेच्या ताब्यात न आलेल्या जागेचे भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारीसो,सांगली यांचेकडे सादर करणेस मान्यता देणेकामी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर कामी कोर्टमॅटर असलेने व लेखा विभाग व लेखापरिक्षण विभागाचा अभिप्राय घेतलेला नसल्याने कायदेशिर बाबींची पूर्तता होत नसलेने याबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल महासभेसमोर सादर करावा असे ही सभा आदेशित करीत असून, सदरचा विषय ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- श्री. रोहिणी मोहिते. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संजय मेंढे. D.P. Suryavanshi महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १८/०८/२०२२

ठराव क्रमांक :- २८९

विषय क्रमांक :- १७

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.०८/०८/२०२२ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१८ मध्ये होवून, सार्वत्रिक निवडणूकीनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० (२) अन्वये सोळा सदस्यांची महासभा ठराव क्र.५१ दि.१०/०९/२०१८ अन्वये अधिनियमातील तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार स्थायी समितीवरील सोळा सदस्यांची नियुक्ती होवून, स्थायी समिती अस्तित्वात आली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०(३) अन्वये महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारनंतर स्थायी समिती वरील निम्मे सदस्य निवृत्त होतील. अशी तरतुद आहे. त्यामुळे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकचे पहिली महासभा दि.१०/०९/२०१८ रोजी झाल्याने, विद्यमान स्थायी समिती मधील निम्मे सदस्य म्हणजे आठ सदस्य अधिनियमातील कलम २०(४) मध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या त्यांच्या तारखेपूर्वी स्थायी समितीचा सभापती ठरविल अशा वेळी व अशा रितीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळापर्यत असतील ते निवृत्त होतील. त्यानुसार स्थायी समिती मध्ये जास्त काळापर्यत काम केलेले आठ सदस्य दि.०१/०९/२०२२ रोजी निवृत्त होत असल्याने, अधिनियमातील तरतुदीनुसार तौलनिक संख्याबळानुसार भारतीय जनता पार्टीचे ०५ सदस्य, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ०२ सदस्य आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ०१ असे एकूण ०८ सदस्यांची नियुक्ती करणेकामी संबंधीत गटनेते यांनी बंद लखोट्याद्वारे लेखी दिले पत्रानुसार खालील सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१.	मा. नसीम सलीम शेख	भारतीय जनता पार्टी
२.	मा.प्रकाश बाबासो ढंग	भारतीय जनता पार्टी
३.	मा.स्वाती नितीन शिंदे	भारतीय जनता पार्टी
४.	मा.संजय चंद्रकांत कुलकर्णी	भारतीय जनता पार्टी
५.	मा.धीरज चंद्रकांत सुर्यवंशी	भारतीय जनता पार्टी
६.	मा.रोहिणी सत्यजीत पाटील	भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
७.	मा.शुभांगी महेश साळुंखे	भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष
८.	मा.पवित्रा विजयकुमार केरीपाळे	राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

तसेच, उक्त विषयाच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे गटनेते श्री.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी त्यांच्या पक्षाच्या स्थायी समिती सदस्या डॉ.नर्गिस शमशोद्दीन सय्यद यांनी दि.०८/०८/२०२२ रोजी राजीनामा दिलेला असल्यामुळे त्यांचे झालेल्या रिक्त जागी त्यांचे कोट्यातून स्थायी समिती सदस्य नियुक्त करणेचे विषयपत्र प्राप्त झाले असल्यामुळे त्यांनी सभागृहामध्ये मागणी केलेनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रिक्त झालेल्या स्थायी समिती सदस्यपदी डॉ.नर्गिस शमशोद्दीन सय्यद यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

वरील प्रमाणे नोंद घेवून योग्यती पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सां. मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.रविंद्र माने महापौर,

D.P.Suryavanshi.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३

ठराव क्रमांक :- २९०

दिनांक :- १८/०८/२०२२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

विधान परिषद, उपसभापती मा.डॉ.निलमताई गोऱ्हे यांच्या विधान परिषद आमदार निधीतून रुग्णवाहिका खरेदी करणेसाठी र.रु.२२ लाख रुपये मंजूर करणेचे असून, सदरची रुग्णवाहिका गितांजली सेवाभावी संस्थेस कायमस्वरुपी ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेस देणेचे असून, सदर संस्थेने त्याबाबत महासभेची मान्यतेची मागणी केलेली आहे.

सदर रुग्णवाहिकेचा वापर नागरीकांना रुग्णालयात पोहचविणे व रुग्णालयातून ने आण करणेसाठी होणार आहे तसेच गरीब व गरजू रुग्णांना सुद्धा होणार आहे. तसेच रुग्णवाहिका देखभाल दुरुस्ती,चालक पगार,इंधन खर्च वाहन विमा इ.खर्चही सदर संस्था करणार असून, सदर रुग्णवाहिकेचा कोणताही अपघात झालेस त्याची जबाबदारी सदर संस्थेची राहणार आहे. सदर रुग्णवाहिकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरीब व गरजू रुग्णांना लाभा होईल यांची दक्षता सदर संस्थेने घेणेची आहे.

सबब, सदरची रुग्णवाहिका खेरदी करणेस व सदरची रुग्णवाहिका गितांजली सेवाभावी संस्थेने मागणी केलेनुसार कायमस्वरुपी ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणेस देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.अतहर नाथाकडी ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.सोडजी मोहिते. D. P. Suryawanshi महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- (विस) ०२ दिनांक :- ०२/०९/२०२२

ठराव क्रमांक :- २९१

विषय क्रमांक :- ०१

महापालिकेच्या दि.१८/०८/२०२२ रोजी झालेल्या महासभेमध्ये झाले चर्चेनुसार विशेष महासभा ठराव क्र.१८२ दि.३०/०३/२०२२ अन्वये पारित करणेत आलेल्या ठरावामधील पाणीपट्टी व घरपट्टी देयकांचे एकत्रीकरण करुन दोन सहामाहीमध्ये एकत्रीत देयके नागरिकांना प्रदान करणेस मान्यता देणेत आलेल्या ठरावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महासभा ठराव क्र.१८२ दि.३०/०३/२०२२ अन्वये पाणी पुरवठा विभागकडील वित्तीय तूट भरुन काढणेसाठी नळ जोडणी न घेतलेल्या मालमत्ता धारकांना द्विमासिक रु.३२०/- किमान आकारणी करणेस मान्यता देणेत आलेली होती. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील गाळेधारक, व्यावसायिक,खुले भूखंड त्याचबरोबर नळ कनेक्शन न घेतलेल्या आस्थापना,झोपडपट्टीधारक व इतर मालमत्ता धारक यांना पाणी पट्टी आकारणी करुन बिले देणेत आलेली आहेत. त्यामुळे पाणी नळ कनेक्शन न घेता देण्यात आलेल्या पाणी बिलाबाबत नागरिकांचेमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असून, सदर पाणी कनेक्शन नसताना देण्यात आलेली पाणी बिले रद्द करणेबाबत सर्व स्तरातून मागणी होत आहे. तसेच, सदर ठराव क्र.१८२ मध्ये एक महिन्यापेक्षा जास्त काळ मीटर नादुरुस्त असल्यास अशा मीटर धारकांना मीटर दुरुस्त करुन सुस्थितीत आणेपर्यत दुप्पट दराने पाणी पट्टी आकारणी करणेस मान्यता दिलेली आहे. सदरची दुप्पट दराची आकारणी रद्द करणेबाबत नागरिकांचेकडून मागणी होत आहे. त्याचबरोबर सदर ठरावामध्ये घोषित झोपडपट्टी भाग व ग्रुप कनेक्शनला पाणी पट्टी आकारणी वगळणेत आलेली असताना सुद्धा प्रशासनाने घोषित झोपडपट्टी व ग्रुप कनेक्शन असणाऱ्यांना चुकीच्या पद्धतीने पाणी पट्टी आकारणी केलेली आहे. त्यासही झोपडपट्टीधारक व नागरिकांनी विरोध केलेला आहे.

उपरोक्त सर्व वस्तुस्थिती पहाता व सभागृहामध्ये सर्व सन्मा.सदस्य यांनी व्यक्त केलेल्या भावनांचा विचार करता, महापालिका क्षेत्रामध्ये अद्याप पुर्ण वेळ, पुरेशा प्रमाणात व उच्च दाबाने पाणी पुरवठा ही होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे अपुरा,कमी वेळ व कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने सरसकट पाणी पट्टी आकारणी करणे या सभेस उचित वाटत नाही. तथापि, घरपट्टी व पाणी पट्टी एकत्रित बिले देण्यास ही सभा सहमती दर्शवित असून, ज्या मालमत्ता धारकाकडे पाणी कनेक्शन नाही अशा गाळेधारक, व्यावसायिक,खुले भूखंड त्याचबरोबर आस्थापना,झोपडपट्टीधारक यांना आकारणी करणेत आलेली पाणी बिले ही सभा रद्द करीत असून, ज्या मालमत्ता धारकांकडे पाणी कनेक्शन आहे त्यांनाच एकत्रित बिल देण्यास व ज्या मालमत्ता धारकांकडे नळ कनेक्शन नाही त्यांना फक्त घरपट्टी आकारणीची बिले देण्यात यावीत असे ही सभा आदेशित करीत असून, ज्या पाणीपट्टी धारकांची मीटर नादुरुस्त असल्यास दुप्पट दराने आकारणी करणेस देणेत आलेली मान्यता ही सभा रद्द करीत आहे.

तसेच, घरपट्टी, पाणी पट्टी वसुलीसाठी प्रशासनाने महापालिका क्षेत्रामध्ये मनपा.आरोग्य केंद्रामध्ये बिल कलेक्शन सेंटर सुरु करावीत असे ही सभा सूचित करीत आहे. त्याच बरोबर नळ कनेक्शन नसताना बिल वाटप केल्याने, नागरिकांनी बिले भरली नसल्याने घरपट्टी / पाणी पट्टी भरण्यास नागरिकांना दोन महिने जादा मुदत देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच, एकाच मालमत्तेला डबल घरपट्टी लागली असल्याबद्दल काही नागरिकांच्या तक्रारी आलेल्या असल्याने त्याबाबत प्रशासनाने शहानिशा करुन, अशी घरपट्टीची बिले दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

त्याचबरोबर महापालिका क्षेत्रात १००% पाणी मीटरींग करणेसाठी प्रशासनाने वॉटर मॅपींग करावे व नविन चांगल्या दर्जाचे पाणी मीटर बसविणेबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल महासभेकडे सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- SSorde सौ. सविता मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने. D.P. Suryavanshi महापौर,

1) कर निर्धारक संकलक.
2) पाणीपुरवठा अभियंता.
3) पाणीपुरवठा आॅपरेटर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका